आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार, दिनांक १८ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. मुंबई इथं नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्सच्या स्थापनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता; फिक्की आणि CII ची असणार भागीदारी.
2. केंद्रीय मंत्रिमंडळानं गगनयान कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून भारतीय अंतरिक्ष स्टेशनच्या पहिल्या युनिटला दिली मंजुरी; चंद्रयान ४ मोहिमेचाही होणार विस्तार.
3. अल्पवयीन मुलांसाठीच्या "वात्सल्य" या नव्या पेन्शन योजनेचा केंद्रीय अर्थ मंत्र्यांच्या हस्ते आरंभ; नागपूर जिल्ह्याचा ऑनलाईन सहभाग.
4. बॅडमिंटनमध्ये ऑलिम्पिक विजेत्या ग्रेगोरिया तुनजुंगला सरळ सेट मध्ये पराभूत करत नागपूरच्या मालविका बन्सोड हिची चायना ओपन मध्ये दमदार सलामी.

****

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय-'वन नेशन वन इलेक्शन

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत आज अनेक महत्वपूर्ण प्रकल्पांबाबत निर्णय घेण्यात आले. देशभरात एकाचवेळी निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या 'वन नेशन वन इलेक्शनच्या' अमलबाजवणीच्या शक्यता पडताळण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी सरकारने आज स्वीकारल्या आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना माहिती देताना सांगितलं की, माजी राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने राजकीय पक्ष आणि तज्ञांसह संबंधितांशी या विषयी विस्तृत चर्चा केल्यानंतर या शिफारशी करण्यात आल्या आहेत. 'वन नेशन वन इलेक्शनची अंमलबजावणी दोन टप्प्यात होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेतल्या जातील, तर पंचायत आणि नगरपालिका यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सार्वत्रिक निवडणुकीच्या 100 दिवसांच्या आत घेतल्या जातील.

****

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय-प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियान**

**केंद्रीय मंत्रिमंडळाने फॉस्फेटिक आणि पोटॅशिक खतांवर रब्बी हंगाम** 2024-2025 **साठी पोषण आधारित अनुदान दर मंजूर केले आहेत. सरकारने शेतकऱ्यांना किफायतशीर दर देण्यासाठी आणि ग्राहकांसाठी जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतील अस्थिरता नियंत्रित करण्यासाठी प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियानाच्या योजना सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे सरकारने एकूण** 79 **हजार** 156 **कोटी रुपयांच्या प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियानाला मंजुरी दिली आहे. ही योजना सक्षम पायाभूत सुविधांचा विकास करून, आर्थिक सक्षमीकरण, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्याची उपलब्धता सुनिश्चित करून आदिवासी समुदायांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारेल.**

****

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय -नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स**

**ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटीसाठी नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्सच्या स्थापनेला मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. हे केंद्र मुंबई इथं स्थापन केलं जाणार असून फिक्की आणि** CII **यांची यात भागीदारी असेल. याद्वारे संशोधनासह विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना एकत्र आणत नवनिर्मितीसाठी प्रयत्न केले जाणार आहे. यासोबतच बायोमॅन्युफॅक्चरिंग आणि बायोफाउंड्री या नवीन घटकासह बायोटेक्नॉलॉजी रिसर्च इनोव्हेशन आणि उद्योजकता विकास योजनेला देखील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.**

****

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय-भारतीय अंतरीक्ष स्टेशन (**BAS-1)

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने गगनयान कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून भारतीय अंतरिक्ष स्टेशनच्या पहिल्या युनिटला मंजुरी दिली आहे. भारतीय अंतरीक्ष स्टेशन (**BAS-1) **च्या पहिल्या मॉड्यूलच्या विकास आणि कार्यप्रणालीसाठी विविध तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक आणि प्रमाणीकरण करण्यासाठी मिशन गगनयान कार्यक्रमाची व्याप्ती करण्यात आली आहे. २०२८ पर्यंत भारतीय अंतरिक्ष स्थानक -** BAS **१ ची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्याचप्रमाणे चंद्रयान ४ मोहिमेच्या विस्ताराला केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. चंद्रावर मानव**

पाठवण्यासाठी आवश्यक तयारी करणे, त्यासाठी यान चंद्रावर उतरवण आणि त्यानंतर त्याला सुरक्षित पृथ्वीवर परत आणणं या मोहिमेचा भाग आहे. शुक्र मोहिमेलाही केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली.

****

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-वर्धा दौरा**

शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर रोजी वर्धा इथं सकाळी ११.०० वा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा स्वावलंबी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याची प्रशासनान जय्यत तयारी केली आहे. या सोहळ्याला राज्यपाल, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्री उपस्थित राहणार आहेत. अमरावती इथल्या पीएम मित्रा पार्कच ई-भूमीपूजन, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही पतंप्रधानांच्या हस्ते यावेळी होणार आहे.यावेळी पीएम विश्वकर्मा योजनेतील यशस्वीगाथा दर्शविण्यासाठी थीम पॅव्हेलीयनची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये देशभरातील १८ कारागिरांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचा समावेश आहे. समारंभानंतर दोन दिवस ही प्रदर्शनी सर्व नागरिकांसाठी खुली राहणार आहे. थीम पॅव्हेलियन इथं कारागिरांशी संवाद साधल्यानंतर पंतप्रधान जनसभेला संबोधित करतील. दिड हजार विश्वकर्मा, ५ हजार आयटीआय प्रशिक्षणार्थी, स्वयंसाहय्यता गटाच्या वीस हजार महिलांसह ५० हजारांचा जनसमुदाय यावेळी उपस्थित राहणार आहे.

****

**राहुल गांधी**

गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचे नेते लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची हत्या करण्याच्या, त्यांना शारीरीक इजा पोहोचवण्याच्या धमक्या देत आहेत. हे अत्यंत गंभीर आहे. या संदर्भात काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधांना पत्र लिहिले आहे पण अद्याप या धमकीबाजांवर कारवाई करण्यात आली नाही. या धमक्या गंभीर असून सरकारने यांच्यावर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी उद्या गुरुवारी काँग्रेस पक्ष राज्यभर रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस

कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. दरम्यान लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून धमकी देणाऱ्या भाजप खासदार अनिल बोंडे यांच्याविरोधात अमरावतीत गुन्हा दाखल झाला आहे. काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर, खा.बळवंत वानखेडे, यांसह काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात ठिय्या मांडून आंदोलन केल्यानंतर भारतीय न्याय संहितेच्या कलम १९२,३५१(२),३५६(२) या कलमा अंतर्गत अमरावतीच्या राजापेठ पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

वात्सल्य योजना

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या अल्पवयीन मुलांसाठीच्या "वात्सल्य" या नव्या पेन्शन योजनेचा शुभारंभ आज नवी दिल्ली येथून केला. या राष्ट्रीय शुभारंभ सोहळ्यात नागपूर जिल्ह्याचा ऑनलाईन सहभाग होता. नागपूर येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स, बेलतरोडी येथील विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांनी या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण पाहिलं तसच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं संबोधन सुद्धा ऐकलं. नागपूर जिल्ह्यातील अग्रणी बँक असलेल्या बँक ऑफ इंडिया व्दारे आयोजित या कार्यक्रमात बँक व्यवस्थापक मोहित गेडाम, नाबार्डचे सहाय्यक व्यवस्थापक सचिन सोनोने आणि स्कूल ऑफ स्कॉलरच्या मुख्याध्यापक उमा भालेराव उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या पालकांनी एनपीएस वात्सल्य या योजने विषयी विचारलेल्या प्रश्नांना अधिकाऱ्यांनी उत्तर देऊन त्यांचं शंका समाधान केलं. एनपीएस वात्सल्य योजनेमुळे लहान वयातच मुलांना पैशाच्या बचतीचं महत्त्व कळणार असून आपण नक्कीच आपल्या मुलाच्या उज्वल आणि सुरक्षित भविष्यासाठी एनपीएस वात्सल्य खाते उघडणार असल्याची भावना यावेळी पालकांनी व्यक्त केली. एनपीएस वात्सल्य ही 0 ते 18 वयोगटातील बालकांसाठी नवीन पेन्शन योजना आहे. पालक आपल्या मुलांच्या नावे या पेन्शन योजनेत महिन्याला किमान 1 हजार तर वर्षभरात कमाल अमर्यादीत रुपये जमा करू शकतात. पाल्य 18 वर्षाचा झाल्यावर हे खाते अखंडपणे नियमित एनपीएस खात्यात किंवा एनपीएस नसलेल्या योजनेत रुपांतरीत केले जाऊ शकते. यामुळे मुलांसाठी दीर्घकालनी बचत आणि आर्थिक नियोजनाला हातभार लागणार आहे.

****

**मालविका बनसोड**

**भारतीय बॅडमिंटनपटू मालविका बन्सोड हिने आज गांगझू इथं चायना ओपन 2024** BWF **सुपर थाऊसंड (1000) स्पर्धेत महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेली आणि पॅरिस ऑलिम्पिकची कांस्यपदक विजेती ग्रेगोरिया तुनजुंग हिला पराभूत करून कौतुकास्पद कामगिरी केली. या स्पर्धेतील पाचव्या मानांकित ग्रेगोरियाला 26-24, 21-19 अशा सरळ सेटमध्ये हरवत मालविकाने हा दमदार विजय मिळवला. नागपूरमध्ये जन्मलेली आणि नागपूर मेट्रोची ब्रँड ॲम्बेसेडर असलेली मालविका बनसोड मागील अनेक वर्षांपासून बॅडमिंटनच्या ज्युनियर सर्किटमध्ये सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. जानेवारी २०२२ मध्ये सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत रौप्य पदक जिंकल्यानंतर ती सर्वप्रथम चर्चेत आली होती.**

****

**एक पेड माँ के नाम**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरणदिनी सुरु केलेल्या 'एक पेड़ माँ के नाम' या अभियानाअंतर्गत माहिती आणि प्रसारणमंत्रालयानं आजपर्यंत सुमारे सात हजार झाडं लावली आहेत. देशभरातल्या शहरी आणि ग्रामीण मिळून विविध कार्यालयात हे अभियान राबवण्यात आलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून अभियानात योगदान द्यायला सुरुवात केली. कालपासून सुरु झालेल्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानातही माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या कार्यालयांमधे वृक्षलागवडीचं काम हाती घेतलं आहे. याअंतर्गत आकाशवाणी नागपूरच्या परिसरात आज वनविभागाच्या प्रमुख सौमिता बिश्वास यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं. याप्रसंगी आकाशवाणी नागपूरचे उपमहासंचालक रमेश घरडे, कार्यक्रम प्रमुख रचना पोपटकर गजभिये आणि आकाशवाणीतील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. आकाशवाणीच्या इतर कार्यालय परिसरात लावण्यासाठी वनविभागाने रोपटी उपलब्ध करून दिली आहेत.**

****

**हवामान**

**आज आणि उद्या नागपूर सह विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.**

*****